# पालकांच्या सहकार्याने शाळेचे सर्वधर्म समभाव ध्वज वंदन उत्साहात!


दिव्या राजपूत पुरस्कार स्विकारताना

पुणे । प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने स्वयंस्फूर्तीने विद्यार्थ्यांच्या पालकांनी आणि शिक्षकांनी मिळून आदल्या दिवशीच शाळेचे सुशोभीकरण आणि सजावट केल्याचे अनोखे चित्र, येथील छत्रपती संभाजी महाराज इंग्लिश मेडीयम स्कूल नं. १७ येथे पाहावयास मिळाले! या शाळेतील ध्वजारोहण आणि विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे कवी, गझलकार आणि साहित्यिक श्रीकांत वाघ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कर्मवीर भाऊसाहेब हिरे हायस्कूलचे माजी मुयाध्यापक संजय विनायक भैलुमे, संभाजी महाराज विद्यालयाच्या मुयाध्यापिका सौ वेरोनिका डिसोझा आणि शाळेचे अध्यक्ष संतोष शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

निशस्त्राची देत प्रचीती
स्वातंत्र्याची केली प्राप्ती!
जय जय गांधी,
जय जय गांधी!
एकटाच तू पुढे निघाला
मग मागे जनसागर आला!
ज्योतीने तव
जळल्या ज्योती!
जय जय गांधी,
जय जय गांधी!

या आपल्या कवितेतून कवी श्रीकांत वाघ यांनी महात्मा गांधींनी स्वातंत्र्य चळवळ कशाप्रकारे राबविली याचे चपखल वर्णन केले!

संतोष शिंदे यांनी कांतीवीर शहीद भगतसिंग यांच्या बालपणीच्या प्रेरणादायी शौर्य कथा विद्यार्थ्यांना सांगून मार्गदर्शन केले. भैमुले यांनी देशभक्तीपर कवितेतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन त्यांना गौरविण्यात आले.

इस्मत शेख हिने निबंध स्पर्धेत प्रथम कमांक पटकावला, चित्रकला स्पर्धेत दीक्षा निरेट्टी, ऋषिका राजपूत, विधी कांबळे, दिव्या राजपूत, कौस्तुभ शिंदे, मनीष तांबीटकर यांनी विविध पुरस्कार मिळविली, तर रांगोळी स्पर्धेत प्रथम– खुशबू राजपूत इ. ७वी, द्वितीय– अमिरा कुदसी इ. ७वी, आणि तृतीय कमांक अनुष्का कोनांगीरी इ. ४ थी या विद्यार्थ्यांनी पटकाविले! शिक्षिका प्रीती रोकडे, मंदाकिनी भोसले यांनी कवायती, विद्यार्थ्यांची भाषणे आणि सांस्कृतिक कार्यकम अतिशय सुंदर बसवून घेतले. कार्यकमाचे प्रास्ताविक मुयाध्यापिका डिसोझा यांनी केले, सूत्रसंचालन ज्योती शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन स्नेहल राऊत यांनी केले.

## पान १ वरून

### सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

मात्र पैसे काढण्याचा प्रयत्न करताच विविध चार्जेस भरावे लागतील अशी अट घालण्यात आली. त्यातून संशय आल्याने फिर्यादींनी सायबर पोलीसांकडे धाव घेतली.

तपासात धक्कादायक उलगडा :

सायबर पोलीसांनी तपास सुरू केला असता या पैशांपैकी काही रक्कम बँक ऑफ महाराष्ट्र मधील 'मारुफ रिअल इस्टेट' नावाच्या खात्यात जमा झाल्याचे समोर आले. तेथून पैसे रोख स्वरूपात काढून आरोपींनी कि'प्टोकरन्सी (णडऊढ – टेदर) खरेदी केल्याचे उघड झाले. या प्रकरणात साहिल अनवर सय्यद (२२, बीबीए विद्यार्थी, कोंढवा, पुणे), भुपेंद्र अवतार सिंग (३४, पासपोर्ट एजंट, कोंढवा, पुणे), सर्फराज रफीक सय्यद (२९, गॅरेज व्यवसाय, कोंढवा, पुणे) या तिघांचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. या बँक खात्यावर याआधीपासूनच ७ तक'ारी दाखल असल्याचेही समोर आले आहे.

पोलीसांची समन्वित कारवाई :

ही कारवाई पोलीस आयुक्त मा. विनयकुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, गुन्हे शाखा उप आयुक्त डॉ. शिवाजी पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सपोनि प्रविण स्वामी, पोउपनि वैभव पाटील, पोउपनि सागर पोमण, पोउपनि रोहीत डोळस, पोउपनि प्रकाश कातकाडे यांच्यासह सायबर पोलीस ठाण्याचे पथक सहभागी झाले. न्यायालयीन कामकाजात सरकारी अभियोक्ता गिरीष बारगजे यांनी बाजू मांडून आरोपींची पोलीस कोठडी मिळवून दिली. या आधीच या प्रकरणात चित्रपट निर्माता शिवम बाळकृष्ण संवत्सरकर याला अटक करण्यात आली आहे. सध्या या गुन्ह्यातील मोठ्या रकमेचा शोध व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कि'प्टो व्यवहारांचा माग काढण्याचे आव्हान सायबर पोलीसांसमोर आहे. पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांची ही धडाकेबाज कारवाई पुन्हा एकदा गुन्हेगारांना धडा शिकवणारी ठरली आहे.

### भारती विद्यापीठ पूना कॉलेज ऑफ फार्मसी चा संशोधन सहकार्य करार

विद्यार्थी साठी स्किल डेव्हलपमेंट कार्यशाळा आयोजित केली आहे . आय सी टी विद्यापीठ मुंबई चे डॉ. के एस लढ्ढा हे प्रमुख वक्ते व ट्रेनर मार्गदर्शन करणार आहेत.

### आपल्या पुढील पिढीसाठी शहरातील हरित व निरोगी वातावरण निर्माण करणे ही आपली सामुहिक जबाबदारी – आयुक्त शेखर सिंह

स्थानिक प्रजातींमुळे शहरातील पर्यावरणीय संतुलन राखण्यास हातभार लागणार असून, जैवविविधतेचे संवर्धन होणार आहे. या ठिकाणी पक्षी, प्राणी, कीटक आणि सूक्ष्म जीवांसाठी सुरक्षित नैसर्गिक अधिवास उपलब्ध होणार आहे.

“ शहरातील नागरिकांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणाशी जोडणे हे महापालिकेचे प्रमुख ध्येय आहे. घनवन प्रकल्पासारखा उपक'म शहराच्या शाश्वत विकासाच्या दिशेने घेऊन जाणारा आहे. शहरातील इतर उद्यानांमध्ये देखील या उपक'माची पुनरावृत्ती करण्यात येणार आहे.
– प्रदीप जांभळे पाटील,
अतिरिक्त आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका

“ घनवनामध्ये वेगवेगळ्या देशी व दुर्मिळ वनस्पतींची लागवड केली असून, त्यांचे जतन व संवर्धना– चे काम उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाच्या वतीने करण्यात येणार आहे. महापालिकेच्या तसेच शहरातील इतर उद्यानांमधील मोकळ्या जागेत अशा दुर्मिळ व औषधी वन– स्पतींची लागवड करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.
– महेश गारगोटे,
मु'य उद्यान अधिक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# पाणी पुरवठा योजनांच्या कामांना गती देण्याकरिता समन्वयक अधिकाऱ्यांची नेमणूक करा : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

पुणे । प्रतिनिधी

हर घर जल–जल जीवन मोहिमेअंतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या कामांना गती देण्याकरिता जिल्हा परिषद आणि म हाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्यावतीने समन्वयक अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, यादृष्टीने सर्वांगिण बाबींने विचार करुन जिल्ह्यातील एकही वाडी, वस्ती, शाळा, अंगणवाडी पाण्यापासून वंचित राहणार नाही,याबाबत दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केली.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन समिती बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री. डूडी म्हणाले, हर घर जल–जल जीवन मोहिमेअंतर्गत पाणी पुरवठा योजनांचा प्रस्ताव सादर करतांना शाश्वत पाणीसाठा, प्रकल्पाकरिता लागणारी जागेची उपलब्धता व त्याकरिता पर्यायी व्यवस्था, सोलार प्रकल्प, पाणी पुरवठा योजना चालविणारी यंत्रणा आदी सर्वांगीण बाबींचा समावेश करावा. प्रलंबित कामांवर लक्ष केंद्रीत करुन ती गतीने पूर्ण करण्यावर भर द्यावा. येणाऱ्या अडचणी सोडविण्याकरिता प्रशासकीय यंत्रणेने स्थानिक लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा. पुर्ण झालेली पाणीपुरवठा योजना संबंधित ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्याची कार्यवाही करावी. या योजनांकरिता लवकरात लवकर महावितरणने वीज जोडणी करुन द्यावी. पाणी पुरवठा योजनांअंतर्गत पाण्याचा शाश्वत स्त्रोतांचा समावेश करुनच अटल भूजल योजनेअंतर्गत आराखडा सादर करावेत. यापूर्वी जिल्हा भूजल विकास यंत्रणेने स्थळ पाहणी करुन पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी करावी.

श्री. पाटील म्हणाले, जलजीवन मोहिमेत जिल्ह्यात एकूण १ हजार ८३६ ग्रामपंचायतीचा समावेश आहे, यामाध्यमातून ९ हजार ३३५ वाड्या–वस्त्यांना पाणीपुरवठा केला जाणार आहे. जागेबाबत प्रलंबित कामाबाबत यंत्रणेने पाठपुरावा करावा, स्थानिक पातळीवरील विषय जागेवर मार्गी लावण्याकरिता समन्वय ठेवावा, असेही श्री. पाटील म्हणाले.

यावेळी जलजीवन मोहिमेतील कामांची सद्यस्थिती, जिल्हा परिषद आणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्यावतीने काम ाच्याअनुषंगाने प्रस्तावित आराखडा, कृती आराखडा, प्रगतीपथावरील कामे, कामे करतांना येणाऱ्या अडचणी, प्रकल्पाकरिता लागणरी जागा, वीज जोडणी आदी विषयांबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

# व्हॉट्सअ‍ॅप लिंकवरून तब्बल ११ लाखांची ऑनलाईन फसवणूक

पिंपरी । प्रतिनिधी

संत तुकारामनगर परिसरातील एका डॉक्टरांची तब्बल ११ लाख १५ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संजय बाबर (वय ५२) यांना अनोळखी मोबाईल क्रमांकावरून व्हॉट्सअ‍ॅपवर लिंक पाठवण्यात आली. त्यांनी ती लिंक उघडल्यावर त्यांच्या मोबाईलमध्ये संशयास्पद अ‍ॅप डाऊनलोड झाले. त्यानंतर शेअर मार्केटिंगमध्ये गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून फिर्यादींकडून विविध बँक खात्यांवर पैसे जमा करण्यास सांगण्यात आले. या पद्धतीने आरोपींनी एकूण ११ लाखांहून अधिक रक्कम लाटली. या प्रकरणी माहिती तंत्रज्ञान कायदा २००० व भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून आरोपी अद्याप फरार आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.



# अंधत्व मुक्त महाराष्ट्र'च्या मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेला 'दृष्टी यज्ञ'च्या माध्यमातून बळ

## आतापर्यंत १,८०० शाळांमधील ७.५ लाख विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी पूर्ण

मुंबई । प्रतिनिधी

अंधत्व मुक्त महाराष्ट्र करणे हे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. शासनामार्फत याबाबत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांच्या नेत्र तपासणीसाठी एप्रिल २०१९ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासन, वनसाईट एसीलर लक्सोटिका फाऊंडेशन आणि रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यात करार करण्यात आला असून आतापर्यंत १९ जिल्ह्यांच्या १८०० शाळांम धील ७.५ लाख विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये दृष्टीदोष असल्यास त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होऊन त्यांच्या शैक्षणिक वाटचालीवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. यामुळे मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारातून शासनाने नेत्र तपासणी आणि चष्मे बनविणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या कंपन्यांपैकी असलेल्या एसीलर लक्सोटिका सोबत भागीदारी करार केला. यानुसार २५ लाख शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करून विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार मोफत चष्मे देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत तपासणी झालेल्या आणि चष्म्याची आवश्यकता असलेल्या ४२,७६२ विद्यार्थ्यांना उच्च–गुणवत्तेच्या चष्म्यांचे वाटप करण्यात आले आहे.

या मोहिमेच्या माध्यमातून शहरांबरोबरच दुर्गम, ग्रामीण आणि आदिवासी शाळांतील विद्यार्थ्यांची देखील नेत्र तपासणी करण्यात येत आहे. 'दृष्टी यज्ञ – युनिव्हर्सल स्कूल आय हेल्थ प्रोग्राम' ही अशी योजना आहे ज्यामधून धूसर दृष्टीमुळे कोणत्याही मुलाचे शिक्षण बंद पडू नये याची दक्षता घेतली जाते. या माध्यमातून राज्यातील हजारो मुलांचे जीवन बदलत आहे.

मोहिमेचे उद्दिष्ट

महाराष्ट्रातील २५ लाख शालेय विद्यार्थ्यांची सखोल नेत्र तपासणी करून दृष्टी दोष असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. यातील पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी झालेल्या जिल्ह्यांमध्ये मुंबईसह ठाणे, पालघर, सातारा, नाशिक, पुणे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, सांगली, बीड, कोल्हापूर, चंद्रपूर, सोलापूर, अकोला, धुळे, जालना, बुलढाणा, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील शाळांचा सम ावेश आहे. गजबजलेल्या महा नगरांपासून दुर्गम आदिवासी खेड्यांपर्यंत, या मोहिमेच्या माध्यमातून अशा शाळांपर्यंत पोहोच साधली आहे जिथे विद्यार्थ्यांना पूर्वी फळा स्पष्ट पाहण्यात अडचण येत होती. मोबाईल तपासणी युनिट्स, कुशल पथके आणि जागतिक दर्जाच्या एसीलर लक्सोटिका लेन्स यांनी धूसर दृष्टीची जागा स्पष्टता आणि नवीन आशेने घेतली आहे. परिणामी हे विद्यार्थी आता ताण न घेता वाचतात, लक्षपूर्वक आणि नव्या आत्मविश्वासाने अभ्यासात सहभाग घेत आहेत.

हा केवळ नेत्र आरोग्याचा कार्यक्रम नाही तर ती महाराष्ट्राच्या भविष्याची गुंतवणूक आहे. स्वच्छ दृष्टीची हमी देऊन, आपण चांगल्या शिक्षणाचे, उच्च ध्येयांचे आणि उज्ज्वल भवितव्याचे दरवाजे उघडतो आहोत, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यानिमित्ताने व्यक्त केला आहे.

# केंद्रीय विद्यालय क्रमांक २ वायुसेना पुणे येथे युवा संसदचे भव्य उद्घाटन

पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय विद्यालय क्रमांक २, एएफएस लोहगाव, पुणे येथे १९ व २० ऑगस्ट रोजी आयोजित युवा संसद कार्यक्रमाचे उद्घाटन आज मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात झाले. या दोन दिवसीय कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, नेतृत्व क्षमता तसेच चिकित्सक चिंतन विकसित करणे हा आहे.

उद्घाटन सत्राचे मुख्य अतिथी म्हणून श्री बापूसाहेब तुकाराम पठारे, माननीय आमदार (वडगाव शेरी विधानसभा क्षेत्र) उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी विद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना अनुशासन, जबाबदारी आणि सृजनशील विचारांनी लोकशाही बळकट करण्याचे आवाहन केले.

विशिष्ट अतिथी म्हणून एअर कमोडोर सतबीर सिंग राय, एअर फोर्स स्टेशन, लोहगाव, पुणे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करताना सांगितले की अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढीस लागते.

या कार्यक्रमाला सौ. ए. पी. कच्छाप, सहाय्यक आयुक्त, केव्हीएस प्रादेशिक कार्यालय, मुंबई, श्री गर्ग, प्राचार्य, श्री भारत भूषण, प्राचार्य, केवी २ एएफएस पुणे, श्री जगदीश चंद्र, उपप्राचार्य, तसेच श्री संजय कुमार पाटील, मुख्याध्यापक विशेषत: उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी संसद कार्यवाहीचे अनुकरण करत म हत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांवर चर्चा व वादविवाद सादर केला. त्यांच्या या सादरीकरणातून खरी लोकशाही साकार झाली.

विद्यालयाचे प्राचार्य श्री भारत भूषण यांनी मुख्य अतिथी, विशिष्ट अतिथी व सर्व मान्यवरांचे स्वागत केले आणि आभार मानले. तसेच शिक्षक, सहकारी कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध तयारीचे त्यांनी विशेष कौतुक केले.

केवी क्रमांक २ एएफएस पुणे येथील ही युवा संसद विद्यार्थ्यांना लोकशाही शिक्षणाचा व्यावहारिक अनुभव देत असून त्यांना जबाबदार नागरिक व भावी नेते घडविण्याच्या दिशेने प्रेरित करत आहे.



# आत्महत्या : एक वाढती समस्या

पान २ वरून

करत असते. नैराश्य आणि आत्महत्या यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. आत्महत्येचे विचार बोलून दाखवणाऱ्या व्यक्तींबाबत समाजात गैरसमज आहेत. असे विचार बोलून दाखवणारे लोक नाटक करतात असा मोठा गैरसमज आढळतो. योग्य औषधोपचार व समुपदेशनाद्वारे अशा व्यक्तींना बाहेर काढता येते.

सांस्कृतिक घटकांमध्ये रंगभूमी, चित्रपट, ओटीटी, रिॲलिटी शो, डान्स स्पर्धा इत्यादी क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. लवकर प्रसिद्धी मिळवण्यासाठी लोक या स्पर्धेत उतरतात. पण मन आणि डोक्याचा समतोल राखता आला नाही की ताण वाढतो आणि हार होईल या भीतीने आत्महत्येचे प्रमाण वाढते. ार्थिक घटकांमध्ये पैसा हा दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग असतो. पण कधी हाच पैसा आत्महत्येचे कारण बनतो हे समजत नाही. पैसा मिळवण्यासाठी सतत काम करणे, टार्गेट पूर्ण करण्यासाठी धावपळ करणे, कार्यालयीन राजकारणाला सामोरे जाणे यामुळे चिंता, नैराश्य, ताण, भीती, असुरक्षितता, व्यसनाधीनता वाढते. परिस्थितीला सामोरे जाण्यात अडचणी आल्यास व्यक्ती आत्महत्येचा विचार करते.

शैक्षणिक घटकांमध्ये शिक्षण हा सर्वांचा हक्क आहे. पण या क्षेत्रात प्रचंड स्पर्धा व अपेक्षा असल्यामुळे विद्यार्थ्यांवर दडपण वाढले आहे. परिणामी, आठवड्यातून एकदा तरी आत्महत्येची बातमी ऐकायला मिळते. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, १५ ते १९ वर्षे वयोगटात आत्महत्या हे मृत्यूचे चौथ्या क्रमांकाचे प्रमुख कारण आहे. आत्महत्येचा विचार करणाऱ्या व्यक्तींमध्ये चिंताग्रस्त होणे, नैराश्य, ताण–तणाव, चिडचिड, झोप व जेवण कमी होणे, नकारात्मक विचार, एकटे राहणे, सतत मूड बदलणे, व्यसन करणे अशी लक्षणे दिसून येतात.

या विचारातून बाहेर पडण्यासाठी काही बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. समस्या व परिस्थिती स्वीकारणे, योग्य मार्गदर्शन, औषधोपचार, समुपदेशन व सायकोथेरपीचा आधार घेणे, भविष्याबरोबर आजच्या दिवसातील विचार व कृतींना महत्त्व देणे, छंद जोपासणे, प्राणायाम, योग व व्यायामाचा समावेश करणे या गोष्टी उपयोगी ठरतात. कुटुंब, कामाच्या ठिकाणी, मित्रपरिवार किंवा सम ाजात अशा व्यक्ती दिसून आल्यास त्यांना एकटे ठेवू नका, त्यांच्याशी संवाद साधा. मानसिक अवस्थेत बदल जाणवल्यास नजीकच्या मानसोपचार रुग्णालयात उपचार घ्या. आत्महत्येचे विचार येत असतील तर शासकीय स्तरावर आयोजित टोल फ्री क्रमांक १४४१६ वर फोन करून समुपदेशन घेता येते.

हा विषय अत्यंत मोठा आणि विस्तृत आहे, मात्र मी तो थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जाता जाता प्रसिद्ध कवयित्री एमिली डीकन्सन यांच्या कवितेच्या काही ओळी आठवतात – Hope is the thing with feathers / That perches in the soul / nd sings the tune without words / nd never stops - at all

– श्रीमती रोहिणी भोसले,
समाज सेवा अधीक्षक,
प्रादेशिक मनोरुग्णालय,
येरवडा, पुणे

# हवाई – नागरी संरक्षण दल दरम्यान 'हॉटलाईन' शहरातील आपत्कालीन इशारा देणारे भोंगे बंद

पान १ वरून

नागरी संरक्षण दलाचे कार्यालय असलेल्या नवीन प्रशासकीय इमारत ते लोहगाव येथील हवाई दला पर्यंत ही हॉट लाईन टाकली जाणार होती. त्यानंतर या हॉट लाईनच्या माध्यमातून हवाई दल व नागरी संरक्षण दल यांच्या मध्ये आपत्कालीन स्थिती संवादाचे हे एक महत्त्वाचे माध्यम असते. यासह या हॉट लाईनवर शहरातील एकाहत्तर भोंगे वाजविले जाणार आहेत. मात्र, याचे गांभिर्य नसलेल्या विभागीय आयुक्त कार्यालयाने चक्क नागरी संरक्षण दलाचे कार्यालय राज्य मागासवर्गीय विभागाला देण्याचे आदेश दिले.

शहरातीपल ७१ भोंगे कालबाह्य

पुणे शहरात पूर्वी ७१ भोंगे बीएसएनएल यंत्रणेवर अधारीत होते. स्वयंसेवक स्वत: सकाळी साडेदहा हे भोंगे सुरू करीत. मात्र ही यंत्रणा कालबाह्य झाली. त्यामुळे नवीन भोंग्यांसाठी केंद्र सरकारने निधी दिला आहे. त्यामुळे येरवडा येथील बीएसएनएल ते नवीन प्रशासकीय इमारती मधील संरक्षण दल कार्यालय ते लोहगाव येथील हवाई दला पर्यंत हॉट लाईन' साठी केबल टाकण्याचे काम सुरू होते. या हॉट लाईन वर हवाई दल व नागरी संरक्षण दला मध्ये संवादासाठी वापरले जाणार आहे. या हॉट लाईनवर शहरातील कानाकोपर्या पर्यंत आपत्कालीन स्थितीचे संदेश देणारे भोंगे बसविणार आहेत.

# 'गब्बर' पुन्हा होणे नाही?

पान २ वरून

खलनायक साकारण्याची संधी मिळाली होती. दोन्ही चित्रपट आणि त्यातील अमरिश पुरी यांचा खलनायक गाजला, पण गब्बरचे स्थान अबाधित राहिले!

खुद्द रमेश सिप्पी यांनीही शान चित्रपटात एक आगळावेगळा खलनायक शाकाल नावाने उभा केला होता. कुलभूषण खरबंदा यांनी ती भूमिका जबरदस्त साकारली होती. शाकालची आठवण रसिकांना आजही आहे, पण शाकाल गब्बरची जागा नाही घेऊ शकला.

अमजद खानच्या गब्बर पूर्वी प्राण यांनी जिस देश में गंगा बहती है मधील डाकू राका सह अनेक चित्रपटातील खलनायकी भूमिका गाजवल्या. प्रेमनाथ यांनीही धर्मात्मा, जॉनी मेरा नाम आदी सिनेमात व्हिलन साकारला, त्याचप्रमाणे अजित यांनी तेजा, लायन आदी नावे धारण करून जंजिर, यादोंकी बारात, कालीचरण असे सिनेमे आपल्या खास शैलीत संवाद फेकीने गाजवलेच होते. पण आजही सिनेरसिक म्हणतात गब्बर सिंग जैसा खलनायक अबतक पैदा नहीं हुआ!

– श्रीकांत वाघ
पुणे मो:९९२३३१६२११

# मानसिक आजारावर 'टेली मानस' व्दारे लक्षावधी जणांना समुपदेशन

पान २ वरून

जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात तीन लाखापेक्षा अधिकजणांनी औषधोपचार व सुमपदेशन घेतले. अंतररुग्ण विभागात ७५ हजार ७६६जणांवर उपचार केले. तर एक लाख ७५ हजार १३८जणांपर्यंत पोचून त्यांना औषधोपचार व समुपदेशन केले.